Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शनिवार, दि. ९ मे २०२६ । वर्ष १ । अंक ३४ । पाने २।

DIGITAL EDITION



जिल्हा बँक भरतीत भूमिपुत्रांना ७० टक्के आरक्षण!

(पान २ वर)

## तमिळनाडू, पश्चिम बंगालमध्ये आज शपथविधी

# सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा!

## 'टीव्हीके' प्रमुख विजय यांना राज्यपालांनी सत्तास्थापनेचे दिले निमंत्रण

जन सम्राट टाईम्स

**चेन्नई| प्रतिनिधी :** सरकार स्थापन करण्यासाठी गेल्या चार दिवसांपासून करत असलेल्या अथक प्रयत्नांनंतर अखेर 'टीव्हीके' पक्षाचे प्रमुख विजय यांना तमिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी सरकार स्थापनेचे निमंत्रण दिले. काँग्रेसने आधीच पाठिंबा दिलेल्या टीव्हीकेला डाव्या पक्षांसह इतर लहान पक्षांनी पाठिंबा दिल्याने शनिवारी विजय यांचा शपथविधी होणार आहे.

दुसरीकडे पश्चिम बंगालमध्ये अपेक्षेप्रमाणे भाजपचे ज्येष्ठ नेते सुवेंदू अधिकारी यांची विधिमंडळ पक्षनेते पदी निवड करण्यात आली असून शनिवारी ते मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील. ते पश्चिम बंगालमधील भाजपचे पहिलेच मुख्यमंत्री असणार आहेत. तमिळनाडू विधानसभेच्या निवडणुकीत सर्वाधिक १०८ जागा जिंकून विजय यांचा 'तमिळगा वेत्री कळघम' (टीव्हीके) हा सर्वात मोठा पक्ष ठरला. मात्र सरकार स्थापन करण्यासाठी आवश्यक ११८ च्या बहुमताच्या आकड्यापासून हा पक्ष दूर होता.





टीव्हीकेला बहुमतासाठी १० जागांची आवश्यकता होती. काँग्रेस, माकप व भाकप यांनी पाठिंबा दिल्याने 'टीव्हीके' बहुमताच्या जवळ पोहोचली आहे. प्रत्येक दोन जागा जिंकलेल्या व्हीसीके व इंडियन युनियन मुस्लीम लीगने पाठिंब्याचे संकेत दिले असल्याने विजय यांचा सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा झाला. डाव्या पक्षांनी बिनशर्त पाठिंबा जाहीर केल्यानंतर टीव्हीके प्रमुख विजय यांनी सरकार स्थापन करण्यासाठी निमंत्रण मिळावे, यासाठी शुक्रवारी लोकभवनात राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ अर्लेकर यांची भेट घेतली. यावेळी राज्यपालांनी विजय यांना सत्ता स्थापन करण्यास मंजुरी दिली. राज्यपालांची भेट घेतल्यानंतर विजय यांनी भाकप आणि माकप कार्यालयांना भेट घेत सरकार स्थापन करण्यासाठी पाठिंबा दिल्याबद्दल आभार मानले.

### सुवेंदूअधिकारीयांचीमुख्यमंत्रीपदीनिवड

'पश्चिम बंगालमधील भाजपच्या प्रचाराचा चेहरा म्हणून उदयास आलेले ज्येष्ठ नेते सुवेंदू अधिकारी यांची शुक्रवारी भाजप विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड करण्यात आली. यामुळे ते बंगालमध्ये भाजपचे पहिले मुख्यमंत्री बनण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. 'बंगालमध्ये अधिकारी यांचा शपथविधी सोहळा शनिवारी कोलकाता येथील ब्रिगेड परेड मैदानावर होणार आहे. बंगालचे नेते आणि मुख्यमंत्री निवडण्यासाठी भाजप विधिमंडळ पक्षाची बैठक शुक्रवारी गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत कोलकात्यातील एका हॉटेलमध्ये झाली.जाहीर केला. तर भाकपने तामिळनाडूच्या जनतेसाठी स्थिर, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही शासनासाठी विजय यांच्या पक्षाला सशर्त पाठिंबा दिल्याचे सांगितले. व्हीसीकेने टीव्हीकेला पाठिंबा देण्याबाबत तात्काळ कोणतीही अधिकृत घोषणा केली नसली तरी, पक्षप्रमुख थोल थिरुमावलवन यांनी त्यांच्या पक्षाची भूमिका डाव्या पक्षांनी घेतलेल्या भूमिकेशी सुसंगत असेल, असे सांगितले.

---

Selected

### एमआयएम पक्षावर बंदीची मागणी

**छत्रपती संभाजी नगर ।** चंद्रकांत खैरे यांनी नाशिकमधील कथित धर्मांतर आणि लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी निदा खान हिला छत्रपती संभाजीनगरातून ताब्यात घेतल्यानंतर एमआयएम पक्षावर थेट बंदी घालण्याची मागणी केली आहे. खैरे यांनी एमआयएम नेते इम्तियाज जलील आणि स्थानिक नगरसेवकांवर निदा खानला लपवण्यात मदत केल्याचा गंभीर आरोप केला. संबंधित परिसरात अवैध धंदे सुरू असल्याचाही दावा त्यांनी केला आहे. दरम्यान, भाजप आमदार गोपिचंद पडळकर यांनीही या प्रकरणामागे मोठे षडयंत्र असल्याचा आरोप करत इम्तियाज जलील यांच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी केली.नाशिक पोलिसांनी अटक केलेली निदा खान ही दोन महिन्यांची गर्भवती असल्याची माहिती समोर आली असून तिची विशेष वैद्यकीय काळजी घेतली जात आहे. या प्रकरणामुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

---

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## 'दामिनी पथक' पुन्हा ॲक्टिव्ह मोडमध्ये; महिलांच्या सुरक्षेला कवच!

### बाजारपेठांमध्ये वाढणार विशेष गस्त

जन सम्राट टाईम्स

**कासोदा | विशेष प्रतिनिधी:** जळगाव शहरात महिलांवरील वाढत्या अत्याचार, छेडछाड आणि सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या त्रासदायक घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने पुन्हा एकदा 'दामिनी पथक' सक्रिय करत महिलांच्या सुरक्षेसाठी मोठे पाऊल उचलले आहे. बुधवार, ६ मेपासून या विशेष पथकाने शहरभर धडक मोहीम सुरू केली असून महिलांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यावर भर देण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली या पथकाला नव्या स्वरूपात सज्ज करण्यात आले आहे. शहरातील संवेदनशील भाग, शाळा, महाविद्यालय परिसर, बसस्थानके, बाजारपेठा आणि गर्दीच्या ठिकाणी आता नियमित गस्त घालण्यात येणार आहे. यासाठी पथकाला विशेष चारचाकी व दुचाकी वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. १०९१ हेल्पलाईनवर तत्काळ प्रतिसाद महिलांसाठी सुरू असलेल्या १०९१ हेल्पलाईनवर येणाऱ्या तक्रारींवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महिलांना कोणत्याही प्रकारचा त्रास, धमकी किंवा छेडछाड झाल्यास दामिनी पथक त्वरित घटनास्थळी पोहोचणार असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



### महिलांना त्रास देणाऱ्यांवर नजर

हे पथक केवळ कारवाईपुरते मर्यादित राहणार नसून, महिलांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमही राबविणार आहे. सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती, विद्यार्थिनींसाठी 'गुड टच-बॅड टच' मार्गदर्शन, समुपदेशन तसेच पीडित महिलांना कायदेशीर आणि मानसिक आधार देण्याचे काम दामिनी पथकाकडून केले जाणार आहे. टवाळखोरांमध्ये धाक काही ठिकाणी महिला व पुरुष पोलीस कर्मचारी साध्या वेशात गस्त घालणार असल्याने सार्वजनिक ठिकाणी महिलांना त्रास देणाऱ्यांवर करडी नजर ठेवली जाणार आहे.

---

## जिल्हा बँक भरतीत भूमिपुत्रांना ७० टक्के आरक्षण!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने राज्यातील भूमिपुत्रांच्या रोजगारासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या नोकरभरती प्रक्रियेत मोठा बदल करण्यात आला आहे. यापुढे राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये भरती करताना ७० टक्के जागा संबंधित जिल्ह्यातील स्थानिक भूमिपुत्रांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. ३१ जिल्हा बँकांमध्ये लागू होणार नवा नियम राज्यात सध्या ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका कार्यरत आहेत. या बँका प्रामुख्याने शेतकरी, ग्रामीण विकास संस्था आणि सहकारी संस्थांशी निगडित असून त्यांचे कार्यक्षेत्र संबंधित जिल्ह्यापुरते मर्यादित असते. स्थानिक बोलीभाषा, ग्रामीण भागातील अडचणी आणि भौगोलिक परिस्थितीची माहिती असलेले कर्मचारी मिळाल्यास ग्राहकांना अधिक दर्जेदार सेवा देता येईल, या उद्देशाने सरकारने हा निर्णय घेतल्याचे सहकार विभागाने स्पष्ट केले आहे. ७०:३० चा नवा फॉर्म्युला लागू नवीन नियमांनुसार, संबंधित जिल्ह्याचे डोमिसाइल प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांसाठी ७० टक्के जागा राखीव राहणार आहेत.

---

## भूमाफियांवर गुन्हा दाखल करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

जन सम्राट टाईम्स

**पारोळा | शहर प्रतिनिधी:** पारोळा तालुक्यातील पिंपरी मोंढाळे येथे सरकारी गायरान जमीन बनावट कागदपत्रांच्या आधारे हडपल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गावातील गट क्रमांकातील सुमारे दोन एकर सरकारी गायरान जमीन बेकायदेशीररीत्या विक्री केल्याप्रकरणी जळगावचे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी कठोर भूमिका घेत फौजदारी तसेच प्रशासकीय कारवाईचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात सात तत्कालीन ग्रामसेवक, आठ सरपंच आणि अन्य ४० भूमाफियांसह एकूण ५५ जणांवर कारवाई होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या संपूर्ण गैरव्यवहाराविरोधात सामाजिक कार्यकर्ते गुलाबराव जगन्नाथ पाटील यांनी गेल्या साडेचार वर्षांपासून सातत्याने लढा दिला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. तक्रारदार गुलाबराव पाटील यांनी या प्रकरणातील भ्रष्टाचाराचे पुरावे प्रशासनासमोर मांडल्यानंतर त्यांना रोखण्यासाठी आरोपींकडून विविध प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप आहे. काही पोलिस अधिकाऱ्यांशी संगनमत करून त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करण्यात आल्याचाही आरोप त्यांनी केला आहे. या संघर्षादरम्यान त्यांना धमक्यांनाही सामोरे जावे लागले, मात्र त्यांनी माघार घेतली नाही. दरम्यान, एरंडोल येथील उपविभागीय अधिकाऱ्यांच्या चौकशी समितीने या गैरव्यवहाराची पुष्टी केली.

---

## सावित्रीबाई फुले विद्यालयाचा दहावीचा निकाल ८७.९१ टक्के

### मुनीराबी शेख खलील विद्यालयात प्रथम; विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव

जन सम्राट टाईम्स

**जामनेर । प्रतिनिधी** जामनेर तालुक्यातील पहूर येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाने यंदाच्या इयत्ता दहावीच्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ८७.९१ टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी करत यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाच्या या उज्वल निकालामुळे विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यालयातील मुनीराबी शेख खलील हिने ८४.६० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला.



अश्विनी प्रवीण चौधरी हिने ८४.४० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर माहेश्वरी संजय धनगर हिने ८३ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांकावर बाजी मारली. याशिवाय गायत्री योगेश पवार, प्रणिता समाधान क्षिरसागर, महेंद्र समाधान बोरसे, गायत्री दीपक जवखेडे, रोहन अनिल चव्हाण, सोमेश दिनकर घोंगडे, नयन सुनील राऊत आणि आयान आशिक पिंजारी या विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या लौकिकात भर घातली. विद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे, पालकांचे तसेच मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्याच्या बळावर हे यश संपादन केल्याचे यावेळी सांगण्यात आले. "ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर मोठे यश मिळवून दाखवले आहे. विद्यार्थ्यांनी यापुढेही उच्च शिक्षणाच्या माध्यमातून आपले भविष्य उज्वल करावे," अशा शुभेच्छाही संस्थेच्या वतीने देण्यात आल्या. विद्यालयाच्या उत्कृष्ट निकालामुळे पहूर परिसरात समाधानाचे वातावरण असून, गुणवंत विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

---

## सुनील महाजन यांचा डीडीआरकडे राजीनामा

### लक्ष्मण पाटील यांच्या नावाची चर्चा



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** कृषी उत्पन्न बाजार समितीतील गेल्या १२ दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय सत्तासंघर्षावर अखेर शुक्रवारी पडदा पडला. सभापती सुनील महाजन यांनी आपला राजीनामा जिल्हा उपनिबंधकांकडे (डीडीआर) सुपूर्द केला आहे. महाजन यांच्याविरुद्ध १२ संचालकांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केल्याने त्यांचे पद धोक्यात आले होते. अखेर हे संपूर्ण राजकीय नाट्य संपवण्यासाठी भाजपचे आमदार मंगेश चव्हाण यांनी मध्यस्थी करत महाजन यांना राजीनामा देण्यास भाग पाडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. २७ एप्रिल रोजी १२ संचालकांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केल्यानंतर बाजार समितीचे राजकारण चांगलेच तापले होते. या कालावधीत बंडखोर संचालकांसह स्वतः सुनील महाजन यांनी आमदार मंगेश चव्हाण यांची भेट घेतली होती. विशेष म्हणजे, महाजन यांनी जळगाव शहराचे आमदार सुरेश भोळे आणि भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राधेश्याम चौधरी यांना डावलून थेट मंगेश चव्हाण यांच्याकडे धाव घेतल्याने राजकीय चर्चांना उधाण आले होते.

> "सुनील महाजन यांनी राजीनामा दिला आहे. त्यामुळे आता या रिक्त पदावर सभापती निवडीसंदर्भात पुढील आठवड्यात विशेष बैठक बोलावण्यात येईल."
> — **गौतम बलसाणे,** जिल्हा उपनिबंधक, जळगाव

दरम्यान, महाजन यांच्या राजीनाम्यानंतर आता रिक्त झालेल्या सभापतीपदासाठी हालचालींना वेग आला आहे. नुकतेच भाजपमध्ये प्रवेश केलेले लक्ष्मण पाटील यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू असून, त्यांची वर्णी लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### सभापतीपदासाठी हालचालींना वेग

२७ एप्रिल रोजी १२ संचालकांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केल्यानंतर बाजार समितीचे राजकारण चांगलेच तापले होते. या कालावधीत बंडखोर संचालकांसह स्वतः सुनील महाजन यांनी आमदार मंगेश चव्हाण यांची भेट घेतली होती. विशेष म्हणजे, महाजन यांनी जळगाव शहराचे आमदार सुरेश भोळे आणि भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राधेश्याम चौधरी यांना डावलून थेट मंगेश चव्हाण यांच्याकडे धाव घेतल्याने राजकीय चर्चांना उधाण आले होते. दरम्यान, महाजन यांच्या राजीनाम्यानंतर आता रिक्त झालेल्या सभापतीपदासाठी हालचालींना वेग आला आहे.

---

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' उत्साहात !

### शासकीय योजना, दाखले आणि महसूल कामांचा एकाच छताखाली निपटारा;

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी** महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान (टप्पा-१)' अंतर्गत पाळधी येथे विशेष महसूल शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, दाखले आणि प्रलंबित महसूल विषयक कामांचा एकाच ठिकाणी निपटारा करण्यात आल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी मनीष कुमार गायकवाड हे होते. यावेळी धरणगावचे तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी, बळीराजा शेत शिवार पान रस्ता समितीचे सदस्य तथा माजी सभापती मुकुंदराव नन्नवरे, सरपंच विजय पाटील, जिल्हा मुद्रांक अधिकारी कुलकर्णी, नायब तहसीलदार लक्ष्मण सातपुते आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी बोलताना "प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणणे आणि नागरिकांना शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे," असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. विविध विभागांचे स्टॉल्स आकर्षणाचे केंद्र या शिबिरात महसूल विभागासह विविध शासकीय विभागांचे माहिती व सेवा स्टॉल्स उभारण्यात



आले होते. नागरिकांना विविध योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले तसेच अनेक अर्जांवर जागीच कार्यवाही करण्यात आली.शिबिरातील प्रमुख सुविधा: मुद्रांक शुल्क सवलत: मालमत्ता नोंदणी आणि मुद्रांक शुल्कावरील नवीन सवलतींबाबत माहिती देण्यात आली.कॅशलेस रजिस्ट्रेशन: डिजिटल पेमेंटद्वारे नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. ऑनलाइन सेवा: उत्पन्न, जात, अधिवास यांसारखे विविध दाखले ऑनलाइन पद्धतीने कसे मिळवायचे, याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.महसूल प्रश्नांचा निपटारा: शेतजमिनीचे फेरफार, सातबारा उतारा दुरुस्ती, जमीन नोंदीतील त्रुटी आदी विषयांवरील अर्जांवर जागीच सुनावणी घेऊन निर्णय देण्यात आले. नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद सकाळपासूनच शिबिर स्थळी नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. विशेषतः शेतकरी आणि ज्येष्ठ नागरिकांनी या शिबिराचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला."अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली कामे आज एकाच दिवशी मार्गी लागली.

### माहिती व सेवा स्टॉल्स उभारण्यात आले

शासनाच्या योजना थेट गावपातळीवर उपलब्ध झाल्याने मोठा दिलासा मिळाला," अशी भावना लाभार्थ्यांनी व्यक्त केली. या समाधान शिबिरामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी होण्यास मदत झाली असून, शासनाच्या योजना अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. या शिबिरात महसूल विभागासह विविध शासकीय विभागांचे माहिती व सेवा स्टॉल्स उभारण्यात आले होते. नागरिकांना विविध योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले तसेच अनेक अर्जांवर जागीच कार्यवाही करण्यात आली.मालमत्ता नोंदणी आणि मुद्रांक शुल्कावरील नवीन सवलतींबाबत माहिती देण्यात आली.कॅशलेस रजिस्ट्रेशन: डिजिटल पेमेंटद्वारे नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. ऑनलाइन सेवा: उत्पन्न, जात, अधिवास यांसारखे विविध दाखले ऑनलाइन पद्धतीने कसे मिळवायचे, याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

